# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ७० वा ❑ रविवार दि.२० एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांचे निलंबन गुलदस्त्यात का?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

राज्यातील शिक्षण विभागाचा कारभार अतिशय भ्रष्ट झाला आहे. या भ्रष्टाचाराच्या गंगेत शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी, खालचे अधिकारी, शिक्षक, संस्थाचालक या सर्वांचा समावेश आहे.शिक्षणाच्या दर्जाकडे लक्ष देण्याऐवजी चुकीच्या कामांमध्येच कर्मचारी अधिकारी गुंतलेले दिसतात. नागपूर विभागातमध्ये घडलेले प्रकरण हे त्याचे ताजे उदाहरण आहे. राज्यात बोगस शिक्षकांच्या भरतीचा प्रश्न चव्हाट्यावर असतानाच नागपूर विभागात बोगस शिक्षकांच्या नियुक्तीचा प्रश्न परत एकदा ऐरणीवर आला आहे. बोगस नियुक्ती करून व खोटी शालार्थ आयडी तयार करून शासनाला करोडो रुपयांचा चुना या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी लावलेला आहे. यातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांचे निलंबन झाले असले तरी अजूनही अनेक शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले नाही. नागपूर लोकशिक्षण भरतीच्या प्रकरणात आतापर्यंत एकूण पाच अधिकारी तुरुंगात आहे त्यातील एका अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलेले आहे. इतर अधिकारी अजूनही निलंबनाच्या प्रतीक्षेपासून दूर आहे.

प्रस्तावित नियमानुसार एखादा संशयितप्रधी ४८ तासाची कोठडी मिळाल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात येते. शालार्थ व बोगस भरती प्रकरणात अजूनही काही अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले नाही.निलंबनाचा निर्णय घेण्यात विलंब का होत आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी शिक्षण विभागातून प्रयत्न होत आहे का? असा संशय व्यक्त होत आहे.

नागपूर विभागातील विविध शाळांमध्ये अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनास पात्र ठरविण्यात आले. त्याकरिता, बनावट शालार्थ आयडीचा आधार घेण्यात आला आणि शासनाची कोट्यवधीने फसवणूक करण्यात आली. या प्रकरणात शिक्षण उपसचिवांनी चौकशी केल्यानंतर नागपूर शिक्षण विभागाचे वेतन व भविष्य निर्वाह अधीक्षक नीलेश वाघमारे यांना निलंबित करण्यात आले आहे. नागपूर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये २०१९ पासून अशा प्रकारे बनावट पद्धतीने प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्याचे आक्षेप घेण्यात आले होते.

नागपूर जिल्ह्यात सुमारे ५८० बनावट कर्मचाऱ्यांच्या नावाने वेतनाची उचल करून शासनाची मोठी आर्थिक फसवणूक करण्यात आली. शासनाचे शालार्थ पोर्टलवरील माहितीच्या आधारे या प्रकरणात चौकशी केल्यानंतर फसवणूक झाल्याच्या आक्षेपांमध्ये तथ्य असल्याचे आढळून आले आहे .शासनाने शिक्षण विभागाकडून या सर्व शाळांची माहिती मागविली होती. शिक्षण उपसचिवांच्या अध्यक्षतेतील समितीने या प्रकरणात चौकशी अहवाल सादर केला. त्यानंतर, नागपूरचे वेतनपथक अधीक्षक नीलेश वाघमारे यांना निलंबित करण्यात आले आहे.

या कारवाईनंतर, आता शिक्षण विभागातील इतर मोठे अधिकारीही कारवाईच्या जाळ्यात येणार असल्याची शक्यता आहे. यामध्ये, शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक अशा मोठ्या पदावरील अधिकाऱ्यांच्या सहभागाची शक्यता वर्तविण्यात येते आहे. याशिवाय, ज्या शाळांमध्ये अशा खोट्या नियुक्ती केल्या गेल्या त्यांनाही शासनाच्या कारवाईला सामोरे जाऊ शकते. या प्रकरणात काही लोकप्रतिनिधींच्या जवळच्या मध्यस्थांचाही समावेश असल्याची माहिती आहे.

कितेक वर्षापासून शिक्षण विभागात भ्रष्ट्राचार होत असताना या बाबत विविध संघटनांनी आक्षेप घेतल्यानंतर देखील सरकार व शिक्षण विभाग कमालीचे बेसावध होते..

शालार्थ आयडी'मध्ये गैरप्रकार होत असल्याचा आरोप दोन वर्षांआधी करण्यात आला होता. तसेच माजी उपसंचालक वैशाली जामदार यांच्या विरोधातही तक्रार झाली होती. नरड अमरावती शिक्षण मंडळात सचिव असताना त्यांनी या प्रकरणात चौकशी केली होती. परंतु, पुढे काहीच झाले नाही. विशेष म्हणजे, शिक्षण आयुक्तांनी बनावट 'शालार्थ आयडी'च्या प्रकरणात दोन तपास समिती नेमल्या होत्या. या समित्यांनीही काहीच कारवाई का केली नाही, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

शिक्षण आयुक्त मांढरे यांनी देखील राज्यातील शिक्षण विभागातील बोगस नियुक्त्या व भ्रष्टाचारावर अहवाल सरकारला सादर केला होता, थातूरमातूर प्रशासकीय झाली.मात्र मोठे मासे गळाला लागलेच नाही..जे लागले ते निवृत्त झाले..काहींचे देहावसान झाले. म्हणून शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार खणून काळाचा असेल तर एसआयटीची स्थापना करण्यात यावी.

# मनुष्यबळ विकास हा नव्या जगातील शाश्वत विकासाचा मंत्र–धारूरकर

ज्योतिर्मय सराहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – नव्या जगामध्ये मनुष्यबळ विकास हा शाश्वत विकासाचा मंत्र आहे. महर्षी व्यास यांनी महाभारतामध्ये असे म्हटले होते की, जगात माणसासारखे अन्य काहीही महत्त्वाचे नाही. सर्वात प्राधान्याने माणसाचा विचार केला पाहिजे. यावरून आपणास राष्ट्र उभारणीत मनुष्यबळ विकासाचे महत्त्व लक्षात येते, असे मत प्रसिद्ध विचारवंत आणि माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांनी गुरुवारी, येथे व्यक्त केले.

डॉ. हेडगेवार रुग्णालय परिसरातील दामू अण्णा दाते सभागृहात इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट म्हणजे आयएसटीडी संस्थेच्या ५५ व्या वर्धापन दिनानिमित्त समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. धारूरकर म्हणाले, आयएसटीडी या संस्थेने देशांमध्ये प्रशिक्षण संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या तीन दशकात छत्रपती संभाजीनगर सह खानदेश आणि अहिल्यानगर तसेच मराठवाडा विभागातील एक शिखर संस्था म्हणून आयएसटीडीने महत्त्वाचे कार्य केले आहे. दिवसभर चाललेल्या चर्चासत्रामध्ये प्रामुख्याने प्रशिक्षण कार्य, संस्कृती, मनुष्यबळाचा विकास तसेच प्रशिक्षणातील गुणवत्ता इत्यादी सत्रांमध्ये विविध शोधनिबंध सादर करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. जयप्रकाश बागडे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमात माजी अध्यक्ष डॉ. रंजन गर्गे




यांना उत्कृष्ट कार्यासाठी आयएसटीडी पुरस्कार महेश देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विविध चर्चासत्रांमध्ये सीए संजीव बजाज, सुधीर कोर्टीकर, सतीश वानखेडे, गोपाळ सोनार, डॉ. रंजना देशमुख, सुरेश साकला, कॅप्टन डॉ. श्रेयस आहेर यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमलता बागडे व अनुजा खडके यांनी, तर अशोक गुरनाळे यांनी आभार मानले. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

# भगवान महावीर अध्यासनासाठी शासनाकडून सर्वोतोपरी सहकार्य–पालकमंत्री प्रकाश आबिटकर

## शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व परिसरात अध्यासन इमारतीचे भूमीपूजन

ज्योतिर्मय सराहित्य

**कोल्हापूर** – शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासन स्तरावरुन सर्वोतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही आज महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वे कडील परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमीपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. भूमीपूजनानंतर झालेल्या समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

मंत्री आबिटकर यांच्या हस्ते कुदळ मारुन तसेच कोनशिलेचे अनावरण करून भूमीपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांना यावेळी इमारतीच्या कामाविषयी तसेच अध्यासनाच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली.

पालकमंत्री श्री. आबिटकर म्हणाले, एरव्ही शासन म्हणून आम्ही नेहमी देण्याच्या भूमिकेमध्ये असतो. तथापि, विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी आज प्रथमच अनेक दात्यांच्या हातून देणगीनिधी स्वीकारण्याची दुर्मिळ संधीही



लाभली. आपल्या कष्टाची मिळकत आपण अध्यानासाठी देत आहात, ही उल्लेखनीय बाब आहे. दातृत्वातून मिळणारा आनंद मोठा असतो. शिवाजी विद्यापीठाने समाजाशी नाते जोडल्याने या अध्यासनाच्या कामाची उंची वाढली आहे. हे कोल्हापुरातच होऊ शकते. विद्यापीठाने आपल्या विविध अध्यासनांच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे भरीव कार्य केले आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्राचे एक भूषणच ठरले आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मूल्यशिक्षणावर भर आहे. भगवान महावीर यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यशिक्षणच आहे. अपरिग्रह, अहिंसा आणि ब्रह्मचर्य या जैन तत्त्वज्ञानावर आधारित असणारे भगवान महावीर अध्यासन हीच भूमिका घेऊन वाटचाल करीत आहे. अध्यासनाची इमारत आणि परिसर हा जास्तीत जास्त पर्यावरणपूरक असेल, याची दक्षता वास्तुरचनेपासूनच घेण्यात आली आहे. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे, अर्थतज्ज्ञ डॉ. जे.एफ. पाटील यांनी या अध्यासनाच्या उभारणीसाठी दिलेल्या योगदानाचाही त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले. संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाने जाहीर केलेला तीन कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. डी.ए. पाटील यांनी अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. शुभम पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

याप्रसंगी उपस्थित असणाऱ्या मान्यवरांनी अध्यासनाला उत्स्फूर्तपणे देणगी जाहीर केल्या. त्यामध्ये रावसाहेब देशपांडे- आणेगिरीकर, सुरेश रोटे, प्रफुल्ल भालचंद्र चमकले, ॲड. महावीर बिंदगे, जयसिंगपूरचे प्रा. आण्णासो इसराणा, उद्योजक नेमचंद संगवी यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली. जैन सेवा संघाचे डॉ. मिठारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १ लाख ११ हजार रुपयांची तर कुंतीनाथ हानगंडे आणि अनिल ढेकणे यांनी ५१ हजार रुपयांची देणगी दिली. या देणगीदारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पूर्वीचे देणगीदार डॉ. बी.डी. खणे, डॉ. एन. एम. पाटील, जीवंधर चौगुले, वसंत नाडे, अरुण माणगावे, अरुणाताई पाटील आदी उपस्थित होते. प्रकल्पपूर्तीसाठी मदत करणारे राजोबा आणि त्यांचे सहकारी, विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव रणजीत यादव, विजय पोवार आणि त्यांचे सर्व सहकारी, डॉ. गिरीश कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या श्रीमती जोशी व श्रीमती कुंभार यांच्यासह जैन श्रावक श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

ज्योतिर्मय सराहित्य

**बीड** – बीड जिल्ह्याला नारळी सप्ताह, अध्यात्म व विचारांची मोठी परंपरा लाभली आहे. संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे ९३ वर्ष सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आ. सुरेश धस, आ. नमिता मुंदडा, आ. मोनिका राजळे, माजी



आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते.

श्री. फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू केले आहे व अजून पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतानी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधव देखील सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.

गहिनीनाथ गडावर येणाऱ्या प्रत्येक भक्ताची उत्तम व्यवस्था झाली पाहिजे, गडासोबतच या परिसरातील भाविकांच्या सोई सुविधांचा तसेच या परिसराचा देखील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, मराठवाडा व बीड जिल्ह्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने कृष्णेचे पाणी आष्टीपर्यंत आणले आहे. ते पाणी संपूर्ण बीड जिल्ह्यात पोचविण्याचा आपला प्रण आहे. मराठवाडा व बीड जिल्ह्याला पाणीदार करण्यासाठी ५३ टीएमसी पाणी गोदाखोऱ्यात आणण्याच्या आराखड्याला देखील मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील दुष्काळ कायमचा मिटेल. आजच्या या पिढीने दुष्काळ पहिला, तो पुढच्या पिढीला पाहू देणार नाही, असेही श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांनी या भागातील लोकांना आध्यात्मिक गोडी निर्माण करणारी सप्ताहाची परंपरा सुरू केली, ती अखंडपणे सुरू आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी तसेच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री महोदय आपल्यासोबत आहेत, त्यामुळे येत्या काळात बीड जिल्हा नक्कीच सुजलाम, सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी संत वामनभाऊ यांनी ९३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या अखंड नारळी सप्ताह परंपरेबाबत माहिती दिली. यावेळी बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...


### गुणसमुच्चयामुळे क्रियाशीलता वाढते

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःच्या जीवनाकडे बघण्याच्या संकल्पना भिन्न असतात. प्रत्येक व्यक्तीचा पिंड निराळे व्यक्तिमत्व घडवत असतो. ज्या वातावरणांत व्यक्ती वावरत असते, लहानाची मोठी होते, त्याच वातावरणाचा पगडा त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर असल्याचे दिसून येत असते. जगात काही व्यक्तींना सज्ञान, तर काहींना अज्ञान ठरवले जात असते. सज्ञान होणे म्हणजे केवळ शारीरिक वय वाढणे नाही. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील वैविध्यपूर्ण गुणसमुच्चय ज्ञानप्राप्ती करण्यासाठी सतत अंतर्मनाला उपकृत करत असतील आणि त्याचा प्रभाव त्यांच्या विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यांवर सदोदित दिसत असेल, तरच त्या व्यक्तीला सज्ञान म्हणता येऊ शकते. अन्यथा त्या व्यक्तीला अज्ञानाची उपाधी लागणे स्वाभाविक असते.

प्रज्ञावंत होण्यासाठी सामान्यज्ञान आणि प्रगल्भ ज्ञान जसे महत्त्वाचे;तसेच त्या ज्ञानाचा योग्य विनियोग, योग्य समज, उपयोजन आणि व्यवस्थापनही होणे तितकेच महत्त्वाचे असते. ही प्रक्रिया राबवण्यासाठी नियमित आत्मचिंतन गरजेचे असते. केवळ एखादी गोष्ट ज्ञात असल्याने आपण शहाणे, हुशार, प्रज्ञावंत ठरत नसतो, ह्याची सतत जाणीव ठेवणे जरुरीचे असते. आपल्या विचारांत आणि कृतीत तादात्म्य असणे गरजेचेअसते. अनुभवांच्या संख्येपेक्षा त्या अनुभवांतून मिळालेली अथवा स्वतःहून मिळवलेली शिकवण किती गुणाढ्य आहे, समृद्ध आहे ह्यावर ते अवलंबून असते, हे प्रत्येकाने सर्वप्रथम ध्यानांत घेतले पाहिजे. म्हणजे केवळ वय आणि बुद्ध्यांक आपल्याला प्रगल्भ बनवतात, आपला स्वर, संवाद, देहबोली, दृष्टिकोन, भावना आणि त्यांचे प्रकटीकरण, हेतू, धोरण, विचारधारा, आचार, कार्यपद्धती योग्य प्रमाणात नियंत्रित ठेवून, स्वतःच्या तसेच इतरांच्या मानसिकतेचा स्वीकार आणि आदर ठेवून, सहअनुभूतीने, सक्रियपणे, वस्तुनिष्ठपणे, जाणतेपणाने आणि डोळसपणे आपला कार्यभार सांभाळणारे, पुढे नेणारे, नात्यातील भूमिका बजावणारे आणि त्यातील विशेषता,वैविध्य जपणारे, स्वीकारणारे तेच खरे 'प्रज्ञावंत' असतात.

## अनोखे अंदमान





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

सेल्युलर जेलचा मुख्य भाग पाहिल्यावर मी परिसरात फेरफटका मारायला सुरुवात केली. ज्या भिंतींनी मला आतल्या कहाण्या ऐकवल्या होत्या, त्यांच्याच सावलीत अजून काही खुणा मला साद घालत होत्या.

जेलच्या प्रवेशद्वाराजवळच एक छोटंसं पण अंतर्मुख करणारं संग्रहालय आहे. आत पाऊल टाकल्यावर काळोख्या भूतकाळाचे यथार्थ प्रतिबिंब डोळ्यांसमोर उभं राहतं. स्वातंत्र्यसैनिकांचे फोटो, त्यांची कैदेतून लिहिलेली पत्रं, जुनं सामान सगळं काही खूप बोलकं वाटतं. एक फोटो होता शृंखलाबद्ध असलेल्या कैद्याचा. त्या डोळ्यांतली शांतता आणि वेदना अजूनही जिवंत होती.


प्रांगणाच्या मध्यभागी उभा आहे एक स्मृतिस्तंभ त्यावर कोरलेली आहेत शेकडो स्वातंत्र्यसैनिकांची नावं. त्याच्याजवळच त्यांची स्मृती जागवणारी एक अखंड ज्योती आहे. भोवताली आहे एक छोटी बाग आणि त्यात विखुरलेली बाकं. हा एक विरंगुळ्याचा नव्हे, तर मनात विचार जागवणारा भाग आहे. तिथे थोडावेळ बसताना जाणवलं स्वातंत्र्याचा अर्थ आपण विसरलो तर हे स्मारक व्यर्थ ठरेल. या




एका कोपऱ्यात जुने फोटो लावलेली एक गॅलरी आहे. त्या फोटोमधून दिसतं तुरुंगाचं जुनं रूप, कैद्यांचे संघर्ष, उपोषणाचे प्रसंग. बाजूलाच आहे एक जुनी विहीर, जी कैद्यांच्या पाण्याच्या गरजा भागवायची. आज ती कोरडी असली तरी आठवणींनी भरलेली आहे.

एका कोपऱ्यात एका पत्र्याच्या शेडमध्ये ज्याला त्या काळात इंग्रज कारखाना म्हणत असत ती वास्तू आहे. ही वास्तू म्हणजे जणू कैद्यांचा छळ करण्याची हक्काची जागा. त्या ठिकाणी एक कोलू आहे. कैद्यांना तेल काढताना हा कोलू फिरवावा लागत असे. त्याला एक लोखंडी दांडा आहे. एखाद्या बैलासारखा हा कोलू फिरवावा लागत असे. अपेक्षित तेवढे तेल निघाले नाही तर फटक्यांची शिक्षा तयारच असायची. त्याशिवाय कैद्यांना नारळाच्या काथ्यापासून दोरही वळावा लागे. त्यांच्याकडून अपेक्षित प्रमाणात कोणतेही काम झाले नाही तर फटके मारण्यात येत असत. कैद्यांना फटके मारण्यासाठी एका त्रिकोणी लाकडी किंवा लोखंडी फ्रेमवर उभे करण्यात येत असे. ती फ्रेम आजही तिथे ठेवली आहे. त्यावर कैद्यांचे हात पाय बांधले जात असत आणि उघड्या पाठीवर आणि पार्श्वभागावर फटके मारले जात. त्यातून रक्त येत असे. कधीकधी मांसाचे तुकडेही लोंबत असत. शिक्षा म्हणून त्यांना तागापासून तयार करण्यात आलेले जाडेभरडे कपडे घालण्यास सांगितले जाई. तेथील उष्ण हवामानात असा पोशाख घालून काम करावे लागे. हे सगळे पाहिले की अंगावर शहारा येतो. अत्यंत विपरीत परिस्थितीत तेथे असलेल्या उष्ण हवामानात केवळ आपल्या देशासाठीच सगळे काही समर्पण करणाऱ्या क्रांतिवीरांनी हा छळ कसं शोषला असेल त्याची नुसती कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. आज आम्ही या सगळ्या गोष्टींची जाणीव ठेवणार आहोत की नाही हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (अ)


**ज्योतिर्मय साहित्य**

दशक ३ (समास २)

स्वगुण परीक्षेचे चार समासात निरूपण केलेले आहे. समर्थांनी फक्त देवधर्म, कर्मसिध्दांताचा विचार मांडला नाही तर त्यांनी मानवी मनाच्या प्रत्येक अंगाचा किती बारकाईने अभ्यास केला आहे हे या समासा वरून लक्षात येते. आता हेच बघाना आता पर्यन्त आपण माणसाने कसे असावे आणि कसे नसावे ह्याचा अभ्यास केला. पण समर्थ मानसशास्त्रीय अभ्यास किती खोलवर जाऊन करत होते हे या समासाचा अभ्यास करताना लक्षात येते. किंवा आपल्या सभोवताली आपण जे आजही काही भलेबुरे पहातो ते त्याकाळी पण होते. सज्जन वाचक मी त्रांनो मला असं म्हणायचं आहे की कितीही कळ लोटला दशक,शतक उलटली तरी माणसाच्या स्वभावात काही फरक पडला नाही.

म्हणजेच दासबोधाचा अभ्यास करणे आजही किती आवश्यक आहे हे लक्षात घ्यायला हवे.

संसारी माणसाच्या जीवनातील चढ उतार या समासात पहायला मिळतात. आपल्या भारतीय कुटुंब संस्थेत आईवडील, बंधूभगिनी बायको मुलं मुली व सर्व गणगोताचा समावेश होतो. लग्नाच्या आधी आईवर प्रेम करणारा मुलगा लग्न झाल्यावर एकदम बदलतो. आणि हा निसर्ग नियम आहे. प्रापंचिक माणूस मुलत:स्वार्थी असतो. स्वार्थाची अंगेतीच असल्याने त्यातुन जन्म पावणा-र्या समस्या सर्वकाळ सदासर्वदा सर्वसमाजात सारख्याच असतात. स्वार्थ साधण्याचे मार्ग मात्र त्या त्या काळच्या विज्ञान प्रगतीवरव एकंदरीत अवलंबून असतात. या समासात मातेच्या ऊदरातुन जन्म घेतल्या पासून लग्न होई पर्यन्तचा सामान्य माणसाच्या विचारांचे कंगोरे अभ्यासायला मिळतात. समर्थांनी ६५ ओव्या मध्ये याचे वर्णन केले आहे. आजही प्रश्न तेच आहेत. मुलगा लहानपणी आई शिवाय जगु शकत नाही व बायको आल्यावर आई अडगळ वाटते. **(क्रमशः)**



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही

**ज्योतिर्मय साहित्य**

पुष्कळ वाचले, ऐकले, पण कृतीत जर उतरले नाही तर त्याचा काय उपयोग ? कृतीशिवाय समाधान नाही. श्रवण कोणी केले? तर ज्यांनी त्याप्रमाणे कृती केली त्यांनी. संतांच्या सांगण्याचा आपण विचारच केला नाही, त्याचे मननच जर केले नाही, तर पुष्कळ सांगितले तरी त्याचा काय उपयोग ? देह हा अनित्य आहे, असे सर्व संतांनी एकमुखाने सांगितले आहे, तरीसुद्धा आम्हांला देहाचे प्रेम सुटत नाही, याला काय करावे ? संतांवर विश्वास नसेल तर स्वतःचा अनुभव पाहावा. देहापासून सर्व सुख आहे असे आपण विचाराने ठरविले, पण खरोखर अनुभव काय येतो ते पाहावे. आपण पाहतो ना, की लहानापासून मोठ्यापर्यंत आणि रावापासून रंकापर्यंत, मनुष्याची सारखी धडपड चालू असते, आणि ती म्हणजे समाधानासाठी. लहानाचे मोठे झालो, विद्या झाली, नोकरी मिळाली, पैसाअडका मिळतो आहे, बायको केली, मुलेबाळे झाली; ज्या ज्या गोष्टीत समाधान मिळेल असे वाटले, त्या त्याकरिता प्रयत्न केला. परंतु मग तरी समाधानाचा लाभ झाला का ? देहाच्या प्रेमाशिवाय प्रापंचिक गोष्टी चालणार नाहीत हे खरे; पण म्हणून देहाच्या सुखाकरिताच जन्मभर आटापिटा करायचा हे योग्य नव्हे. आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही. या देहाचे कौतुक करीत असताना दुसऱ्याची घरभरणी चालली आहे. त्याचा फायदा आपल्याला काहीच होत नाही. देह गेला की सगळे गेले !

कृतीशिवाय जे बोलतात त्यांचा नाश होतो. बोलावे असे वाटते तोपर्यंत बोलणे थांबविणे जरूर आहे. स्वातंत्र्य आणि स्वैरवर्तन बाहेरून सारखीच दिसतात; पण त्यांच्यामध्ये फार फरक आहे. स्वातंत्र्य हे पवित्र आहे, तर स्वैरवर्तन हे घाणेरडे आहे. लोकांच्या स्वातंत्र्याविषयीच्या कल्पना काहीतरीच असतात. खरे म्हणजे, माणसाला स्वातंत्र्य फक्त स्वतःची उन्नती, म्हणजे आत्मोन्नती करण्यापुरतेच आहे. इतर बाबतीत, म्हणजे देहाच्या वगैरे बाबतीत, त्याला बंधनेच असतात, आणि ती आवश्यकच आहेत. देहासंबंधीचे बाप, मुलगा, नवरा, बायको वगैरे म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य राहणारच, पण मनुष्यत्वाचे कर्तव्य असेल तर भगवंताचे होणे हे आहे. ऑफिसला जाणाऱ्यांनी आपले कर्तव्य नीट बजावावे; घरातल्या मंडळींनी आपले काम मन लावून करावे; आणि हे सर्व करून राहिलेला वेळ भगवंताच्या नामात घालवावा. आपण एखादा व्यापार केला तर त्यामधले निव्वळ उत्पन्न हाच आपला खरा नफा असतो, त्याचप्रमाणे प्रपंचातला नफा म्हणजे भगवंताकडे आपले लक्ष किती लागले हा होय.


जेथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृती आहे, तेथेच समाधानाची प्राप्ती होते.

## ॥ संत - महात्म्य ॥

**संकलन : मधुकर बोरीकर**
**9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)**

### संत श्रेष्ठ श्री तुलसीदासजी

**ज्योतिर्मय साहित्य**



रामचरित मानस कार संत श्रेष्ठ श्री तुलसीदास यांचा जन्म श्रावण शुक्ल सप्तमी सन १४९७ यावर्षी राजापूर जिल्हा चित्रकूट उत्तर प्रदेश येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आत्माराम दुबे, तर आईचे नाव हुलसी असे होते. असे म्हणतात की तुलसी दासजी हे त्यांच्या आईच्या गर्भात पूर्ण १२ महिने राहिले होते. जन्मताच त्यांना पूर्ण दात होते.जन्मताच ते राम, राम असे म्हणू लागलेम्हणून त्यांना लोक राम बोला या नावाने ओळखीत.तरीपण त्यांना घरातील मंडळी लहानपणी तुलसी राम असेच म्हणत. त्यांचा विवाह रत्नावली या कन्ये सोबत झाला. त्यांची पत्नी अतिशय सुंदर,विद्वान होती आणि या दोघांची जोडी खूप सुंदर दिसत असे. त्यांना एक तारका नावाचा मुलगा सुद्धा होता.

तुलसीदास हे महर्षी वाल्मिक ऋषी यांचे अवतार मानण्यात येतात.

तुलसीदास यांचे सुरुवातीस आपल्या पत्नीवर अतिशय प्रेम होते. पत्नीच्या सौंदर्यावर ते भाळले गेले होते. तिच्या विना त्यांना एक क्षणभरही करमत नसे.

एकदा पत्नी माहेरी गेली होती. तिची आठवण येताच तिला भेटण्यासाठी ते रात्रीच सासुरवाडीस जाण्यास निघाले. ते पावसाळ्याचे दिवस होते. सर्वत्र नदी नाल्यांना पूर आलेला होता. आणि सासरवाडी जाण्याआधी रस्त्यात एक नदी ओलांडावी लागणार होती. त्याही नदीला महापूर आलेला होता. आता या महापुरात ही नदी कशी ओलांडावी असे वाटून तुलसीदासजी नदी ओलांडण्यास काही मिळते का हे पाहू लागले. तितक्यात त्यांना एक लाकडाचा ओंडका वाहत येताना दिसला. तुळशीदासांनी त्वरने तो पकडून त्यावर चढून बसले, आणि नदीपार केली. रात्रीची वेळ, अंधार काळा मिट्ट पडलेला.कसे बसे ते नदी पर करून पैल तीरावर पोहोचले. इतक्यात विजेचा कडकडाट झाला आणि चमकलेल्या वीजेच्या प्रकाशात त्यांनी पाहिले तर, ज्या ओंडक्या वरून त्यांनी प्रवास केला, तो ओंडका नसून ते एक फुगलेले प्रेत होते. पत्नीला भेटण्याची अधीरता त्यांचे जवळ इतकी होती की, ते फारसा विचार न करता तसेच सासरवाडीच्या गावी आले. तिच्या माहेरच्या वाड्याचे दार बंद होते. पाऊस धो धो कोसळत होता. ढगांचा गडगडाट होत होता. अशावेळी त्यांनी वाजवलेले दार आत कोणासच ऐकू गेले नाही. आता काय करावे या विवंचनेत ते असता त्यांना बाहेरच्या भिंतीवर एक दोर सोडलेला दिसला. त्यांनी त्या दोराला धरून वर चढून माडीवर गेले. माडीच्या घराचे दार वाजवतात त्यांच्या पत्नीने दार उघडून पाहिले तर समोर तुलसीदासजी. तुम्ही यावेळी कसे आलात? तुम्हास दार कोणी उघडले? असे म्हणताच, तुलसीदासजी म्हणाले, अगं तूच नाही का माझ्यासाठी बाहेरच्या भिंतीवर एक दोर सोडलास ! मी कुठला दोर सोडला? असे म्हणून तिने दिव्याच्या प्रकाशात डोकावून पाहिले तर ,तो एक मोठा साप होता. नदी कशी ओलांडली हे विचारतात त्यांनी ती प्रेतावर बसून ओलांडल्याचे सांगितले. हे ऐकतात पत्नी त्यांच्या काळजी पोटी त्यांचेवर रागावली, व ती म्हणाली, या हाडा मासाच्या, मल, मुत्राच्या देहाप्रती तुम्ही एवढे आसक्त झालात? इतक्या ओढीने तुम्ही भगवंताचे स्मरण केले असते, तर तुम्हाला निश्चितच भगवंताचे दर्शन झाले असते.

(क्रमशः)



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**सम्पत्सु महतां चित्तं भवत्युत्पलकोमलम् ।**
**आपत्सु च महाशैलशिलासङ्घातकर्कशम् ।।**

अर्थ – संपन्नतेमध्ये महान लोकांचे चित्त हे कमळाप्रमाणे कोमल असते. आणि विपन्नतेमध्ये ते विशाल पर्वताच्या शिलाखंडाप्रमाणे कठोर होते.

काळाप्रमाणे जो मृदु आणि कठोर होतो, तोच परिस्थिती निभावून नेऊ शकतो. महान लोकांचे चित्त हे सुखात कमळाच्या फुलाप्रमाणे कोमल असते. त्यामुळे कोणाचेही दुःख पाहून ते व्यथित होते. ते इतरांचे दुःख दूर करण्यासाठी मदत करतात. मात्र असे हे सज्जन लोक जेव्हा स्वतः दुःखात असतात, तेव्हा पर्वताच्या शिळेपेक्षा कठोर होतात. अर्थात दुःखामुळे ते डगमगत नाहीत. तर दुःखाचा कठोर होऊन सामना करतात.




## माठातील पाणी पिण्याचे फायदे !

**ज्योतिर्मय साहित्य**

– गेल्या काही दिवसांमध्ये उन्हाची तीव्रता चांगलीच वाढत असून उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. बाजारपेठेतही उन्हाळ्यात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची रेलचेल आहे. थंड पाण्यासाठी वापरले जाणारे माठ, उन्हापासून बचाव करण्यासाठी टोप्या, उन्हामुळे कोरडा पडलेला घसा ओला करण्यासाठी ज्युस सेंटर, रसवंतीगृहांवर होत आहे.

– यातच गरिबांचा फ्रीज म्हणून लौकिक असणारे माठ विक्रीसाठी येतात आहेत. वेगवेगळ्या आकारांमध्ये तसेच वेगवेगळ्या रंगांमध्ये असलेले हे माठ ग्राहकांना आकर्षित करत आहेत. माठ हे माती, म्हणजे अनेक खनिजे आणि पोषक घटकांचा खजिना आहे.

– आपल्याकडे पूर्वी माठातील पाणी पित होते. आजही बरेच जण माठातील पाणीच पितात.

माठातील पाणी पिण्याचे फायदे

– माती नैसर्गिकरीत्या अल्कलाइन शरीरातील ॲसिडिक वातावरणामुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळते. म्हणून शरीराच्या आतील वातावरण ॲसिडिक असण्यापेक्षा अल्कलाइन असेल तर आरोग्य उत्तम राहील. माती ही नैसर्गिकरीत्या अल्कालाइन असते. त्यामुळे मातीच्या माठात ठेवलेल्या पाण्यात मातीचे गुणधर्म मिसळून ते अल्कलाइन होते, असे डॉक्टर सांगतात.

– कोणतेही हानिकारक रसायने नाहीत बहुतांश प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये नावाचे टॉक्सिक केमिकल असते. जे आरोग्याला धोकादायक असतात. म्हणून मातीच्या माठात पाणी ठेवणे अधिक आरोग्यदायी आहे. कारण त्यामुळे पाण्यात मातीचे गुणधर्म मिसळून ते अधिक आरोग्यदायी बनते. पाणी दूषित होत नाही.

– नैसर्गिक थंडावा.

– लहान छिद्र (सच्छिद्र) असलेल्या मातीच्या माठात पाणी नैसर्गिकरित्या थंड होण्यास मदत होते. उन्हाळ्यात खूप वेळ लोडशेडिंग असते किंवा अनेकदा वीजपुरवठा स्थगित होतो. अशावेळी तुमची तहान भागवण्यासाठी तुम्ही फ्रिजमधील थंड पाण्यावर अवलंबून राहू शकत नाही. त्यामुळे माठात पाणी भरून ठेवणे स्वस्त आणि पर्यावरण पूरक आहे.

– मातीचे गुणधर्म.

– माठ बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मातीत भरपूर खनिजे आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक ऊर्जा असते. त्यामुळे मातीच्या माठात पाणी ठेवल्याने मातीतील हे गुणधर्म पाण्यात मिसळतात. परिणामी त्या पाण्याने तुमच्या शरीराला फायदाच होतो.

– मेटॅबॉलिझम सुधारते.

– माठ वापरण्याचा अजून एक आरोग्यदायी फायदा म्हणजे त्यामुळे मेटॅबॉलिझम सुधारते.

– उष्माघाताला आळा बसतो.

– उन्हाळ्यात सामान्यपणे होणाऱ्या उष्माघाताला आळा घालण्यासाठी मातीच्या माठातले पाणी प्या.

– घशासाठी चांगले असते.

– सर्दी, खोकला झाल्यावर आणि अस्थमा असणाऱ्यांना फ्रिजमधील थंड पाणी न पिण्याचा सल्ला दिला जातो. परंतु, माठातील थंडगार पाणी तुम्ही पिऊ शकता. कारण ते पाणी घशासाठी चांगले असते. मातीचा माठ विकत घेताना शक्यतो तो हाताने बनवलेला असावा.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९




**ज्योतिर्मय साहित्य**

सीतेला सोडून लक्ष्मण परतला. आता वाल्या जसा घरच्यांनी झिडकारल्यावर एकाकी झाला होता तशी सीता एकाकी झाली.सीतेला आत्महत्या करावी अशी इच्छा झाली. सुमंताने हे होऊ दिले नाही. तिला सासू, जाऊ यांची आठवण आली. आधीच संध्याकाळची वेळ, वनात एकाकी पडलेली. तिला विकलता आली.त्याच वेळी वाल्मीक यांच्या आश्रमातून कांहीं कुमार तिथे आले. त्यांनी सीतेला पाहिले.पण. ओळखले नाही. त्यांनी वाल्मीक ऋषींना आपल्या आश्रमा शेजारी कोणी एक लक्ष्मी समान दिव्य तेजःपुंज स्त्री आलीआहे व ती रडत आहे हे सांगितले.वाल्मीक सीतेजवळ आले त्यांनी तिला आधी पाहिले होते. त्यांनी तिला ओळखले व आपल्या आश्रमात नेले. तिला रामाने त्यागल्याचे ऐकून वाल्मीक यांच्या मनात रामा बद्दल विकल्प निर्माण झाला.स्त्रीचा अपराध कितीही मोठा असो स्त्रीच्या बाबतीत त्यागन्याला शास्त्र मान्यच करीत नाही.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886


दुसरे दिवशी वाल्मीक तीर्थ स्नानाला गेले. तिथे नारद भेटले.


तिर्थ स्नान करताना काय करावे व काय करू नयेत या विषयी नियम आहेत.

तीर्थ स्नान करण्या पूर्वी घरी आपले स्नान केलेले असावे. आपण मलिन असताना तो मल काढण्यासाठी तीर्थात जायचे नसते तर पाप निवृत्ती साठी जायचे असते. तीर्थात अंगास साबण लाऊ नये, त्यात पोहू नये. पाय उचलून पाण्यात टाकू नये. तिर्थास तुडविल्या सारखे होते.

(क्रमशः)

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

हळूहळू अमल बदलू लागला. आपले लेखन तो चारुलतेला वाचून दाखवण्याऐवजी सामान्य कुवतीच्या मंदाला वाचून दाखवू लागला. चारुलतेला चिडवण्यात त्याला आनंद वाटू लागला. तशातच समीक्षकांनी त्याला धक्का दिला. समीक्षकांनी त्याच्या लेखनापेक्षा चारुलतेचे लेखन उजवे आहे असा शेरा दिला. त्यामुळे अमल दुखावला गेला आणि चारुलता आणि अमल यांच्यातील गैरसमजाची दरी रुंदावत गेली.

याच दरम्यान भूपतीचा व्यवसाय तोट्यात येऊ लागला. परंतु चारूबरोबर त्याला संवाद साधता येत नव्हता किंवा तिलाही त्याच्याबरोबर मोकळेपणाने वागता बोलता येत नव्हते अशा प्रकारचं वातावरण घरात निर्माण झालं होतं. दोघंही आपलं नवरा- बायकोचे नातं काहीशा औपचारिकपणेच निभावत होते.

अमलला आपल्या चुकांची जाणीव आता होऊ लागली होती. आपल्या वागण्याबद्दल गांभीर्याने तो विचार करू लागला होता आणि त्यातूनच त्याने तिथून दूर जाण्याचा निर्णय घेतला. संधी मिळताच तो परदेशात निघून गेला. जाताना त्याने चारुलतेचा मोकळेपणाने निरोपही घेतला नाही. त्याचे असे जाणे चारुलतेच्या मनाला खूप लागले. ती सतत त्याचाच विचार करू लागली.

त्याचवेळी तिचे संस्कारी मन आपण आपल्या पती कर्तव्यात कुठेही कमी पडू नये म्हणूनही धडपडत होते. भूपतीला सुद्धा आपण आपल्या पतीकर्तव्यात कमी पडलो याची जाणीव होऊ लागली होती. पण आता सगळीच गडबड झाली होती. दोघांच्याही वागण्या बोलण्यात अंतर पडले होते. एक घरटे उध्वस्त झाले होते. एकमेकांना समजून घेऊन दुसरे घरटे उभे करण्याची दोघांचीही धडपड केविलवाणी ठरत होती.



## जात्यावरच्या ओव्या......

---

**नातेसंबंध : बहिण-भाऊ**

वाट पाहू पाहू
कोपरा झिजला माडीचा
अजून येईना बाई
दादा बाराच्या गाडीचा ||३६||

वाटानं चालला
दादा गणेशा डुलतो
बघून बांधवाला
माझा कलीजा झुलतो ||३७||

---

संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे
संकलन : सौ मनोरमा बोराडे

# डालडा ही कहाणी.....

हार्टॉग्ज कंपनीने १९२६ साली डालडा या नावाची मक्तेदारी घेतली. अस्तित्वात आल्यापासून पाच वर्षांच्या आत शिवडीच्या फॅक्टरीत डालडा बनायला सुरुवात झाली. १९३७ साली प्रकाश टंडन नावाच्या एका भारतीयाला बोर्डावर घेऊन लिव्हरनी आपले हेतू स्पष्ट केले आणि त्यानंतर हिंदुस्थान लिव्हरच्या अश्वमेधाचा घोडा अडवायला कुणीच धजावलं नाही. स्वैंपाकघरात एकदा डालडा आला आणि नंतर कायमचा तेथेच राहिला.

डालडा या नावाचा एक वेगळाच किस्सा आहे. सुरुवातीला हे वनस्पती तूप भारतात आयात केलं जायचं 'डाडा अँड कंपनी'मार्फत. लिव्हरला स्वत:चा मालकी हक्क दाखवायचा होता. मग त्यात तडजोड म्हणून एल जोडून 'डालडा' नाव तयार झालं.

डालडा म्हटल्यावर नाक मुरडणारी माणसं रांगेत उभं राहून डालडा आणायला लागली. तसं आपल्याकडे डालडा काही नवीन नव्हतं. पण त्याला स्वैंपाकघरात मान्यता नव्हती. पण नंतर हळुहळू तेल किंवा तूप म्हणजे वनस्पती तूप मिळणे, हेच परमोच्च भाग्याचे लक्षण आहे; हे कळल्यावर असल्या शंका मनात येणेच बंद झाले. स्वैंपाकघरात एकदा डालडा आला आणि नंतर कायमचा तेथेच राहिला. याचे श्रेय जाते हिंदुस्थान लिव्हरच्या चिवट मार्केटिंगला.

सुरुवातीला हातगाडीवर स्टोव्ह आणि कढईचा संसार मांडून एक माणूस डालडय़ात पुऱ्या तळून दाखवायचा आणि जमलेल्या गर्दीला आग्रहाने खायला घालायचा.

त्यानंतर डालडय़ात बनवायच्या पाककृतींचं पुस्तकं पण आलं.

डालडा म्हणजे काय तर हायड्रोजिनेटेड तेल. तेलापासून बनवलेलं तूप. म्हणून वनस्पती तूप. दिसायला साजूक तुपासारखं. रंगाने आकर्षक आणि चवीने एकदम बुद्दू. साधारण तेलाच्या रेणू शृंखलेतल्या रिकाम्या शिटा हायड्रोजनच्या रेणूंनी भरून काढल्या की झालं वनस्पती तूप तयार. पॅलॅडीयम नावाच्या एका धातूच्या मदतीने हे स्थित्यंतर सहजशक्य होते. कारण आकारमानाच्या नऊशे पट हायड्रोजनचे रेणू वाहून नेण्याची क्षमता या धातूत आहे. हायड्रोजिनेशन केल्यावर तेलाचं जे काही होतं त्याला म्हणायचं वनस्पती तूप. त्यात थोडासा बदल करून- जीवनसत्त्वाची भर घालून हिदुस्थान वनस्पती मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने पहिल्यांदा डालडा भारतात आणला. नंतर या कंपनीचं नाव हिंदुस्तान युनिलिव्हर ' झालं.

१९६५-१९७१ ची दोन युद्धं झाली. सत्तर, एकाहत्तर, बहात्तरची वर्षे लागोपाठ अवर्षणाची गेली आणि डालडा पण काळ्या बाजारात गेलं. लोकसभेत डालडाच्या वाढत्या भावावर आणि




दुर्भिक्षावर अनेक चर्चा झडल्या आणि डालडा रेशन कार्डावर मिळायला लागलं. राहणीमान बेचव झालं, पण तगून राहण्याची गरज त्यापेक्षा मोठी होती. दादर स्टेशनला उतरल्यावर सामंतांच्या दुकानातल्या काचबंद पेटीतल्या लोण्याच्या प्रचंड आकारमानाच्या गोळ्याकडे बघून सुस्कारा सोडून लोक पुढे निघून जाताना बघितली आहेत. खानदेश-कोइंबत्तूर-बेळगाव ही लोण्याची घराणी आजही कसाबसा जीव तगवून उभी आहेत. डालडाच्या स्पध्रेत अनेक नवीन ब्रॅण्ड आले आहेत. पत्र्याच्या डब्यातलं डालडा प्लॅस्टिकच्या पिशवीत मिळायला लागलं. नव्वदीच्या नंतर हेल्थकॉन्शस पिढी मिळवती झाली आणि नव्या मध्यमवर्गीय कुटुंबात डालडाची गरज संपली. कधी न ऐकलेल्या तेलबियांचं तेल घरात आलं. डालडाने पण 'डालडा ॲक्टिव्ह' या नावाखाली पुन्हा एकदा स्वैंपाकघर काबीज करण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत नव्या सुनांनी आणि नव्या तेलांनी जम बसवला होता. या नव्या तेलाची जाहिरात करणाऱ्या कमनीय बाया कदाचित लिव्हर कंपनीला मिळाल्या नसतील. काही वर्षांपूर्वी लिव्हरनी 'डालडा' ब्रॅण्ड विकून टाकला.

पामच्या झाडाचं चित्र असलेला डालडाचा पिवळा डबा हे कधीच न विसरता येणारे मार्केटिंग आयकॉन आहे आणि डालडाच्या रिकाम्या डब्यात रुजलेले तुळशीच्या रोपटय़ाचे चित्र म्हणजे आपल्या सामाजिक राहणीमानाच्या स्थित्यंतरात कसाबसा जीव धरून राहिलेल्या संस्कृतीचं आयकॉन आहे.

**(स्रोत : सोशल मीडिया)**

***

# महाराष्ट्राचा बहुमान

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई हे लवकरच भारताचे नवे मुख्य सर न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून १४ मे पासून ते भारताचे मुख्य सर न्यायाधीश म्हणून सूत्र हाती घेतील. विद्यमान सर न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. न्यायमूर्ती भूषण गवई हे भारताचे ५२ वे सर न्यायाधीश असतील. याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. सॅम भरूचा, न्या. सरोश कपाडिया, न्यान शरद बोबडे, न्या. उदय लळीत, आणि न्या. धनंजय चंद्रचूड या सात मराठी न्यायमूर्तींना हा मान मिळाला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांना भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु या पुढील महिन्यात १४ तारखेला सर न्यायाधीशपदाची शपथ देतील त्यावेळी इतिहास रचला जाईल. भारताचे सर न्यायाधीश म्हणून शपथ



घेणारे भूषण गवई हे केवळ दुसरेच दलीत न्यायमूर्ती आहेत याआधी के जी बालकृष्णन पहिले दलीत सर न्यायाधीश बनले होते. न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाच्या सर न्यायाधीशपदी नियुक्ती होणे हा महाराष्ट्राचा बहुमान होय कारण ते महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. रीपाई नेते व माजी राज्यपाल रा सू गवई यांचे सुपुत्र असलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावतीत झाला असून त्यांचे प्राथमिक व कायद्याचे शिक्षण मुंबईत झाले. मुंबईतच त्यांनी वकिली सुरू केली. २००५ मध्ये त्यांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. वकील आणि न्यायाधीश म्हणून त्यांना दांडगा अनुभव आहे. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पणजी येथे त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले आहे. २४ मे २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून नियुक्ती झाली. अनेक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिले आहेत. नोटबंदी वैध ठरवणारा २०२३ चा निर्णय त्यांच्या कारकिर्दीतील महत्वाचा निर्णय ठरला. जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवण्याचा निर्णय देणाऱ्या घटना पिठाचा ते भाग होते. प्रशांत भूषण अवमान प्रकरणात निकाल देणाऱ्या खंडपीठाचाही ते भाग होते. कायद्याचे सखोल ज्ञान, सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कौशल्य, नेतृत्वगुण, वंचित आणि उपेक्षितांबद्दलचा कळवला या गुणांमुळे ते आधीच लोकप्रिय आहेत. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या निवडीचा मराठी माणसांना अभिमान आहे. न्यायालय आणि न्यायालयीन कामकाज याविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजूनही काही प्रश्न आहेत. न्यायालयात जलद न्याय मिळत नाही, सर्वसामान्य नागरिकांनी न्यायालयाची पायरी चढूच नये अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. सर्वसामान्य नागरिकांची ही भावना खोटी ठरवून जलद न्याय देण्याबरोबरच न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास दृढ करण्याची जबाबदारी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर आहे त्यात ते यशस्वी होतील यात शंका नाही. देशाचे नवे सर न्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे मनापासून अभिनंदन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# मिश्र भावभावनांचा सुंदर मेळ : मला कवीचा चष्मा लागला

**पुस्तक परीक्षण**

उद्धव भयवाळ,
छत्रपती संभाजीनगर

ज्योतिर्मय साहित्य

कवी, लेखक, बालसाहित्यिक आणि समीक्षक या नात्याने वाचकांना सर्वदूर परिचित असलेले साहित्यिक आणि अनेक पुरस्कारांचे धनी असलेले अरुण वि. देशपांडे यांचा मला कवीचा चष्मा लागला हा बत्तीसावा कवितासंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला. हे त्यांचे ७८ वे पुस्तक आहे.

मला कवीचा चष्मा लागला या काव्यसंग्रहात एकूण ८३ कविता आहेत.

कवी अरुण देशपांडे यांनी मनोगतामध्ये म्हटल्याप्रमाणे तंत्रशुद्ध कविता लेखनासाठी जो अभ्यास लागतो, त्याचा अभाव ही त्यांच्यातल्या कवीची मर्यादा ते ओळखून असल्यामुळे ते छंदोबद्ध, वृत्तबद्ध कविता किंवा गझल रचना लिहू शकलेले नाहीत. तरीही त्यांनी कवितेचा आकृतिबंध सांभाळून अभंग, ओवी आणि मुक्तछंद अशा स्वरुपात काव्यलेखन केलेले आहे.

या काव्यसंग्रहातील शब्द वश या वेड्याला या पहिल्याच कवितेत,

वाटचाल आयुष्याची
वळणदार खडतर ती
मनात असावी कविता
पुरणारी शिदोरी ती

या ओळींमधून, आयुष्याची वाटचाल कितीही खडतर असली तरी कवितेची शिदोरी सदैव सोबत असावी अशी अपेक्षा कवीने व्यक्त केली आहे.

त्याचप्रमाणे, कवितामाहात्म्य या कवितेमध्ये सुद्धा कविता आपल्या आयुष्याशी कशी जोडलेली असते हे खालील ओळींमधून समजते

अस्वस्थ मनास स्थिरता
देऊ शकते ती कविता
भावनांचे प्रतिबिंब असते
सहज सुंदर ती कविता
संयत, संयमी असते कविता
मनाची समजूत घाले कविता
जीवनसार सांगते कविता
पथदर्शनी असते ही कविता

मला कवीचा चष्मा लागला या कवितेच्या या खालील ओळी पहा,

मला कवीचा चष्मा लागला
डोळ्यांना खोल नजर आली
वरवर पाहणे ते चुकीचे
सारा कचरा साफ झाला
मला कवीचा चष्मा लागला
माझ्यातच फरक पडला
नीट समजून घ्यावा माणूस
शोधबोध हा मजला जाहला

माणूस समजून घेत असतांना, माणसाला कवीच्या नजरेतून पाहतांना जी समज येते, त्याचे सुंदर आणि यथार्थ वर्णन या कवितेत केलेले आहे.


आपली मराठी या कवितेच्या खालील ओळींमधून मराठी भाषेचा अभिमान बाळगून मराठी भाषेतच व्यवहार करण्याचे सुचविण्यात आले आहे.

मायमराठीचा गौरव आता
त्रिभुवनी होई जरी साजरा
बाहेर बोलण्याची वेळ येता
का घेशी हिंग्लिशचा आसरा

आतापर्यंत अनेक कवींनी डोळ्यांच्या भाषेची महती सांगितली आहे. या कवितासंग्रहातील डोळे ही कवितासुद्धा डोळ्यांच्या भाषेबद्दल बरेच काही सांगून जाते.

उदाहरणार्थ,

डोळे असतात बोलके
शब्द होतात कधी मुके
चेहरा ठेवा किती कोरडा
डोळ्याकाठी पाणी रुके
मनातले सांगतात डोळे




समजण्या ते सोपे असते
शब्द लागत नाहीत त्यांना
शब्दाविना असते सांगणे

श्रावणगाणी, माझी दुनिया, मनात असले तरी, मस्त पावसात, मित्र, कविता माणसांची, वाचूया पुस्तकं, या आणि इतर सर्वच कविता म्हणजे मिश्र भावभावनांचा मेळ आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

कविवर्य अरुण देशपांडे यांना पुढील लेखनप्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा.

-पुस्तक परिचय-
मला कवीचा चष्मा लागला
(कवितासंग्रह)
कवी अरुण वि. देशपांडे
प्रकाशक- संवेदना प्रकाशन, पुणे
पृष्ठे ९६, मूल्य १५० रुपये

# भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाच्या तयारीसाठी सुवर्णसंधी; एसएसबी कोर्ससाठी मोफत प्रशिक्षण

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक ५ मे ते १४ मे २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६१ आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींना निः शुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे मुलाखतीस हजर रहावे. उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) च्या वेबसाईटवरून एसएसबी-६१ कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबतची परिशिष्टे डाउनलोड करून ती पूर्ण भरून, मुलाखतीच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे.

**पात्रता**

या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडे खालीलपैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे:

कंबाईड डिफेन्स सर्विसेस एक्झामिनेशन नॅशनल डिफेन्स अकेडमी एक्झामिनेशन परीक्षा उत्तीर्ण, तसेच सर्विसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्रता प्राप्त केलेली असावी.

एनसीसी 'सी' प्रमाणपत्र 'ए' किंवा 'बी' ग्रेडसह उत्तीर्ण, आणि एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरकडून एस एस बी साठी शिफारस मिळालेली असावी.

टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी Technical Graduate Course साठी एसएसबी मुलाखत पत्र असणे आवश्यक.

विद्यापीठ प्रवेश प्रणाली साठी एसएसबी मुलाखत पत्र किंवा शिफारस यादीत नाव असावे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे training.petenashik@gmail.com या ईमेल, दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सॲप नंबर ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांनी केले आहे.

## दवा-खाना

# ‘गृहिणी सचिव: सखी .. वगैरे वगैरे!’

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या सर्वात लाडक्या सणाचे अर्थात दिवाळीचे कवित्व सुरु होते ते पुढील वर्षीची दिवाळी येईपर्यंत! या बहुपेडी अन राजेशाही सणाच्या निमित्याने घरचे अन दारचे सोपस्कार पार पाडतांना गृहिणींच्या शक्तीचा पार निचरा होत असतो. दिवाळीच्या तोंडावर नवऱ्याला हातात झाडू घ्यायला लावत साफसफाई करायला लावणाऱ्या गृहिणीवर आलेले विनोद तेवढ्यापुरते तोंडीलावणे म्हणून बरे असतात. पण ते तेवढ्यापुरतेच, कारण विनोद ही गांभीर्याने घ्यायची गोष्टच नव्हे ही पुरुष मंडळींची धारणा पक्की असते. आणखीन एक चीज आहे जी बहुदा चटपटीत आणि चमचमीत असावी अशी मान्यता आहे. त्यात समाजप्रबोधन औषधाला देखील असू नये याची काळजी घेतल्या जाते. ती म्हणजे जाहिरात! मात्र प्रत्येक नियमाला अपवाद असतो मंडळी.




कॉटन किंग या ब्रँडची २२ ऑक्टोबर २०२१ या तारखेला प्रसारित झालेली अधिकृत जाहिरात! गोष्टीचे नांव, कशा असतात ह्या बायका! भाऊबीजेला आपल्या लाडक्या झिपऱ्या लहान भावाला कॉटन किंगचा शर्ट देणारी बहीण, या पलीकडे भावा-बहिणीच्या नात्याचे अलवार पदर उलगडणारी, लहानपणीच नव्हे तर मोठेपणी देखील एकमेकांच्या पाठीशी समर्थपणे उभी राहणारी ही आजच्या आधुनिक काळातील भावाच्या खऱ्याखुऱ्या लाडक्या बहिणीची गोष्ट! प्रत्येक स्त्रीची स्वतःच्या आयुष्यातील सर्व पातळ्यांवर लढण्याची आणि नाती जपण्याची सक्षमता दाखवतांनाच पुरुषप्रधान संस्कृतीवर तरलतेने भावनात्मक भाष्य करणारी ही यू ट्यूब वरील जाहिरात माझ्या मनांत घर करून राहिली आहे. तुम्ही देखील ती अवश्य पहा! भाऊबीजच नव्हे तर ही जाहिरात कधीही बघा योग्य संदेश देतेच देते, कारण त्यात भाऊ बहिणीच्या अलवार नात्याच्या पलीकडे स्त्रीच्या बहुमुखी व्यक्तिमत्वाचे घडवलेले विलोभनीय दर्शन आहे.

महाकवी कालिदासांनी आपल्या ‘रघुवंशम्’ या प्रसिद्ध संस्कृत महाकाव्यात स्त्रीच्या विविध रूपांचे हृद्य वर्णन केले आहे. रघुवंशकुलोत्पन्न अयोध्येचा राजा अज (दशरथाचा पिता) आपली प्राणप्रिय पत्नी इंदुमती हिच्या निधनानंतर शोकसंतप्त होत विलाप करीत म्हणतो,

“गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां बत किं न मे हृतम“ ।।-

(रघुवंशम् -अष्टम सर्ग - ।। ६७ ।।)

(भावार्थ - “हे वल्लभे, तूच माझी गृहलक्ष्मी, मंत्री, सचिव, एकांतात अनन्य हृदयस्थ सखी आणि संगीत-नृत्यादि मनोरम कलांच्या प्रयोगात माझी प्रिय शिष्या होतीस. म्हणूनच सांग (समष्टीरूपाने-एकंदरीत) तुझे हरण करणाऱ्या क्रूर काळाने माझे सर्वस्व हरले नाही कां?)

या श्लोकानुसार एकाच स्त्रीच्या किती भूमिका असतात हे ध्यानात येते. तिला मखरात बसवण्यात भारतीय संस्कृतीचा खूप मोठा हातभार आहे. या पार्श्वभूमीवर एक वाक्य आठवले. मध्यंतरी मुलीशी मैत्री वाढवण्याकरता मुलांमध्ये एका संवादाची आवर्तने होत होती, जेवलीस कां? हा ‘डेंजर ट्रेंड’ असल्याचे ध्यानात आल्यावर मुंबई पोलिसांनी अशा भविष्यकालीन रोमियोंसाठी एक प्रसिद्ध टिवटिव केली होती, ती जेवेल रे तिच्या घरी, काळजी करू नकोस!



**लेखिका**
**डॉक्टर मीना श्रीवास्तव**

आपल्या पतीला अन मुलांना संबंधित स्त्री सतत विचारात असते जेवलास कां? अन आपण तिला असे कधी विचारतो? कित्येक घरांमध्ये कर्त्या पुरुषाला अन मुलांना सकस अन्न द्यायचा परिपाठ आहे. त्यांना अंगमेहनत पडते, म्हणून ही तथाकथित कल्याणकारी योजना! गर्भारपण, मासिकपाळी नामक नैसर्गिक प्रक्रियांमध्ये स्त्रियांच्या रक्तातील लोह तत्व कमी होऊन त्यांना रक्तक्षय होत असतो. याखेरीज अनियमित निकृष्ट आहार अन नियमित उपवासामुळे हा आजार वृद्धिंगत होत असतो. या बाबतीत स्त्रीचे शैक्षणिक, आर्थिक अन सामाजिक स्थान कुठलेही असू दे, तिला या सार्वत्रिक समस्येने ग्रासलेले असते असे खेदाने म्हणावे लागेल. याला माझ्या आत्मानुभवाची जोड आहे. स्वतः कडे दुर्लक्ष करणे हा भारतीयच नव्हे तर अखिल स्त्रीजातीचा स्थायीभाव असावा. स्वतःला त्यागाची मूर्ती म्हणवून घेण्यात धन्यता मानणाऱ्या स्त्रीला इतरांकडून प्रोत्साहन मिळाले तर यात दोष हा कुणाचा?

शेवटी मला सर्व वयाच्या स्त्रियांना असे आवाहन करावेसे वाटते की कोणी जेवलीस कां? असे म्हणो अथवा न म्हणो, आपण आपल्या रोजच्या सकस, संतुलित अन नियमित आहाराचे महत्व ध्यानी घ्यावे! पुरुषमंडळींना घरी यायला उशीर झाला तरी आपण झोपायच्या आधी किमान दोन तास आधी आपली रात्री जेवायची वेळ कां चुकवायची?

तुम्हाला काय वाटतं?

# आतली बातमी फुटली चित्रपटातून मोहन आगाशे आणि रोहिणी हट्टंगडी पहिल्यांदा एकत्र

**ज्योतिर्मय साहित्य**

आजपर्यंत दोन दिग्गज कलाकार एकाच चित्रपटात काम करणे काही नवीन नाही; पण मराठीत असा सुवर्णयोग फार क्वचितच पाहायला मिळतो. आतली बातमी फुटली या सिनेमाच्या निमित्तानं ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे आणि ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी मराठी सिनेमात पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. या दोघांनी अभिनयाच्या जोरावर मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही आपला वेगळा ठसा उमटवला आहे. अशा दोन कलासंपन्न कलाकारांना एकत्र पडद्यावर पाहणं प्रेक्षकांसाठी पर्वणी असेल. विशाल पी.गांधी आणि जैनेश इजरदार यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. येत्या ६ जूनला आतली बातमी फुटली हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या दोन दिग्गजांची चित्रपटात एकत्र येण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळे या दोघांच्या अभिनयाची वेगळी केमिस्ट्री रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. सामान्य माणसाच्या माध्यमातून लेखक-दिग्दर्शकांनी वर्तमानातील कटू सत्य पडद्यावर सादर केलं आहे.

वीजी फिल्म्स बॅनरखाली विशाल पी. गांधी व जैनेश इजारदार यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. आतली बातमी फुटली या चित्रपटाची निर्मिती विशाल पी. गांधी आणि ग्रीष्मा अडवाणी यांची आहे. सह निर्माता अम्मन अडवाणी तर सहयोगी दिग्दर्शक जीवक मुनतोडे आहेत. चित्रपटाचे छायांकन अमित सुरेश कोडोथ तरसंकलन रवी चौहान यांचे आहे. संगीत एग्नेल रोमन यांनी दिले आहे. कथा जैनेश इजरदार यांनी रचली आहे, तर पटकथा जीवक मुनतोडे, अम्मन अडवाणी, जैनेश इजरदार, विशाल पी. गांधी यांची आहे. संवादलेखन जीवक मुनतोडे व अद्वैत करंबेळकर यांनी केले आहे.

# सुरतचा खास लिंबू गोटा बटाटावडा

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रत्येक ठिकाणची बटाटेवडे बनवण्याची पद्धत खूप वेगवेगळी असते. सारण खूप वेगवेगळे असते.तरीही बटाटेवडा हा पदार्थच असा आहे की हा न आवडणारा माणूस जगात कुठेही सापडणारच नाही. याची खासियत म्हणजे हा कसाही बनवला तरी आवडतोच.आपल्या भारतातील तर स्ट्रीट फूड मधील सर्वात जास्त लोकांच्या पसंतीचा,अगदी गरीबांनाही सहज परवडणारा म्हणूनच सर्वाधिक खप असलेला असा खास पदार्थ आहे. कित्येक गरीब लोक अनेकदा वडापाव खाऊन जगतात. तर श्रीमंत लोक सुद्धा तितक्याच आवडीने मिटक्या मारत वडापाव खातात. मुख्य म्हणजे घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या लोकांना तरी झटपट खाऊन पोट भरत असल्यामुळे हा वडापाव म्हणजे वरदानच वाटते जणू! म्हणूनच जम्बो वडा,खिडकी वडा, गोळी वडा अशा कित्येक नावानी हा प्रसिद्ध आहेच. अगदी मोठ्या हॉटेल्स मधून सुद्धा बटाटे वडा-सांबर मिळते आणि रस्त्यावरच्या टपरीवर,गाड्यावर सुद्धा हा मिळतो. गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, लहान-मोठा असा कोणताही भेदभाव ही डिश खाताना दिसत नाही. अनेक ठिकाणचे वडापाव प्रसिद्ध आहेत, त्यातील सुरतचा लिंबू गोटा बटाटेवडा हा खूप प्रसिद्ध आहे. आणि खरंच खूप वेगळा आहे. पाहायचा कसा बनवतात ते?..



साहित्य - उकडलेले मध्यम आकाराचे ४..५ बटाटे, २ बाऊल बारीक चिरलेली कांदा पात,७..८लसुण पाकळ्या,अर्धा इंच आले,५..६ हिरव्या मिरच्या, २ चमचे धने, १चमचा जिरे,२ चमचे तीळ, अर्धी वाटी खवलेला नारळ, १ वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर,१चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ व साखर.




बॅटरसाठी.. ३ वाट्या बेसन, किंचित हळद, चवीनुसार मीठ, १इनो पाऊच किंवा १ चमचा खाण्याचा सोडा, तेल.

कृती - सर्वांत आधी उकडलेला बटाटा व्यवस्थीत कुस्करून घ्यावा.मग त्यात कांद्याची पात, धने, जिरे, तीळ, नारळ घालून आले, लसूण, मिरची वाटून त्यात घालावी. नंतर कोथिंबीर, लिंबाचा रस घालून चवीनुसार मीठ व साखर घालावी व हे सर्व छान एकत्र करून त्याचे छोटे,छोटे गोळे बनवावेत. बॅटर बनवताना एका मोठ्या बाऊल मध्ये बेसन घेऊन त्यात चवीनुसार मीठ, हळद घालून छान मिक्स करावे.आवडतं असेल तर थोडासा ओवा घालावा म्हणजे डाळीचे पीठ वातुळ असते त्याचा त्रास कमी होतो. शिवाय खमंग टेस्ट येते. त्यानंतर पिठात इनो किंवा सोडा घालून थोडे थोडे पाणी घालत व्यवस्थीत फेटावे. थोडेसे ते घट्टसरच ठेवावे.हाताला हलके होऊन मस्त फुगेपर्यंत छान फेटावे. बॅटर भिजवतानाच गॅसवर कढई ठेवून त्यात तेल घालून ते गरम झाले की किंचीत फ्रायपेपर पावडर घालावी म्हणजे तळण्यासाठी तेल कमी लागतेच शिवाय वडेपण तेलकट होत नाहीत. आता गोळे एकेक करत बॅटर मध्ये टाकून घोळवावेत आणि नंतर मोठ्या चमच्याने हा वडा भरपुर बॅटर साहित तेलात सोडावेत. आणि मस्त तांबूस सोनेरी रंगावर तळावेत. आता हे गरम गरम वडे मध्यभागी कट करून त्यावर लिम्बाचा रस, आवडतं असेल तर थोडा चाट मसाला भूरभुरून सर्व्ह करावा.

वैशिष्ट्य: हे लिंबू गोटा वडे आतून कोथिंबीर, कांदापात , कढीपत्ता असल्यामुळे सुरेख हिरवेगार दिसतात तर वरून तांबुस सोनेरी रंगाचे असल्यामुळे खूपच आकर्षक दिसतात. आंबटगोड, नमकीन स्पायसी खमंग असे टेस्ट मे बेस्ट लागतात. मधून मधून धने, तीळ, दाताखाली आले की खूप मजा येते. नारळामुळे एक वेगळीच चव लागते, तर लिंबू, चाटमसाला यामुळे चटपटीत होऊन लज्जत काही औरच लागते. आपल्याकडील बटाटेवड्यांपेक्षा हे खूपच हटके लागतात. मुळातच टेस्टी असल्याने सोबत काही नसले तरी चालते.वरून फ्रेश लिंबू पिळून रस घालून खाल्ला तर जास्त मजा येते. ज्यांना थोडेसे आंबट आवडत असेल त्यांनी जरूर ट्राय करा.

***




## काळी सावली

मोठ्या वृक्षांची...
आदरणीय वृक्षांची...
आजकाल भीती वाटते का?
पूर्वी आदरयुक्त भीती वाटायची!
आणि आता?

त्यांच्या सावलीत वाढणारी...
छोटी छोटी फुलांची झाडे...
प्रचंड दबावात वाढत आहेत...
असे काही जाणवते...
कोण, केव्हा त्या कळ्यांना...
उमलून देण्याआधीच...
उध्वस्त करून टाकतात...
फुलांना निर्दयीपणे कुस्करून...
जाळून टाकून ती राख अंगभर फासून...

ते मोठे वृक्ष...
त्यांचाच सत्कार करतात...
आशीर्वाद घेतात...
काहीतरी चुकतंय!
असे वाटत पण नाही...

काही घटना घडलेल्या...
काही घटना घडत असतांना...
भावनाहीन चेहरे...
त्यांच्या विकृत चेहऱ्याने...
उद्विग्न, भयावह जीवन जगण्याचा आदर्श...
मोठ्या दिमाखात सादर करतात...

स्वप्नात शामची आई...
रडत होती...
मंदिराच्या सगळ्यात खालच्या पायरीवर बसून...
हाकलून दिले लोकांनी...
ती सांगायचा प्रयत्न करत होती...
आई कशी असावी...
शाम आणि शामा...
फिदी फिदी हसत तुडवत होते...
तिच्या सर्व भावनांना...

शाम सारखी आई नकोच...
पण मुलीच्या भावी नवऱ्याला घेऊन...
पळून जाणारी आई पण नको...
आईचा बॉयफ्रेंड...
तिच्या मुलीवर अत्याचार करतो...
आणि आई व्हीडिओ काढून पोस्ट करते...
अशी पण आई नकोच...

पुढील काही वर्षात...
आई राहणार का?
का फक्त जन्म देणारी म्हणून...

नातेसंबंधनाच्या अस्तित्वा वरच...
आपण प्रश्नचिन्ह मोठ्या दिमाखाने मिरवत आहे...

आधुनिक म्हणून जगतांना...
यंत्र, तंत्र महत्वाचे...
माणूस म्हणून काहीच किंमत नाही...

असं शिकवले गेले...
अजूनही शिकवत असतील...
भारतीय संस्कृती...
मानवी मूल्यांची जपवणूक करते...

खरंय!
पण आता वेगळ्या शैलीत शिकवत असणार...

**- सतीश इंदापूरकर**

## रक्त

घामाचे रक्त
करणारा....
मी पाहिला !
जातधर्म न पुसता
रक्तदान करतांना
मी पाहिला !

मेलेल्या प्रेतावरचं
लोणी ओबाडणारा
मी पाहिला!
कुठं रक्ताचा
ज्वालामुखी झालेला
मी पाहिला !

कुठं रक्त
निद्रिस्त झोपलेले
मी पाहिले!
कुठं रक्त
सळसळणारे ...
मी पाहिले !
कुठं रक्त
पेटलेले...
मी पाहिले !

रक्ताच्या नात्यात
दुरावा...
मी पाहिला !
बिनरक्ताच्या नात्यात
ओलावा ...
मी पाहिला !

कसा ओळखू
रक्तातला भेद
रक्ताचा रंग लाल
मी पाहिला!
जखमेवरचे रक्त जांभळून
रक्ताचा रंग
निळा झालेला
मी पाहिला !

सीमेवर सैनिकांचे
रक्त गोठतांना
मी पाहिले !
धर्माच्या दंगलीत
रक्ताचा सडा पडतांना
मी पाहिला !

पण.......
जगाच्या कुठल्याही
प्रयोगशाळेत रक्त
बनवितांना...
मी नाही पाहिले !
मी नाही पाहिले !

**- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
छत्रपती संभाजीनगर
(९८२३११३५९४)

## माहेर..

मेहंदीच्या हातावर
उमटली दाट नक्षी..
माहेरच्या आठवांचा
उभा अंगणात पक्षी..

उभा अंगणात पक्षी
त्याला मोकळे आभाळ..
परतून माहेराला
जाते मन किती काळ..

जाते मन किती काळ
सोयरिक साधण्यास..
झोका जातो वर खाली
कसे सावरु मनास?

कसे सावरु मनास
दाटे उरी हूरहूर
पाखरांनो सांगा आता
लेक भेटाया आतूर..

**- प्रतिभा चौगले**
कोल्हापूर

## चिंतन जीवनाचे

येतात क्षण क्षण हे जातात क्षण क्षण हे
क्षणांच्या संगतीने सरत जाते जीवन हे
येतात क्षण क्षण हे जातात क्षण क्षण हे
आपलेपणाशी नाते आता न आहे कुणाचे
जो तो आहे वाहत जीवनी स्वार्थाचे ओझे
बदलला काळ जगी बदलली सारी नाती
माता पित्यासी सोडूनी लेकरे निघून जाती
जीवनी सांभाळितो ना इथे कोण कुणाला
पैशांचा आहे सारा जीवनी व्यवहार झाला
कर्तव्याच्या नात्यांनी दूष्कर्मी इथे मूकलेला
दूष्कर्मांच्या ओझ्याने आहे जीवनी वाकलेला
आधार घ्यावा इथे जीवनी कुणाचा हा भला
आधार घ्यावा इथे जीवनी ईश्वराचा हा भला
मनुजाच्या कर्मांचा आहे जीवनी खेळ हा सारा
जीवनांती घ्यावा इथे ईश्वराच्या चरणी निवारा

**काव्यरचना : मधुकर ए. निलेगावकर, पुणे**
९४२१३७५६९१

## माय

खरबडे, चरचर, कष्टाळू, कणखर,
मायचे तळहात, फिरे माझ्या गालावर १
घेते ओलागच्च मुका, दात पडल्या ओठाने,
जीव बिलगला जीवा, डोळे भरले काठाने २
पाठीवरून फिरता, गच्च बांगड्यांचा हात,
भेटे लेकराला माय, सांडे पान्हा पदरात ३
डोळे झाले अंधूक, माय वाकली पाठीत,
दंडाच्या झाल्या झोळ्या, चाले काठीला टेकीत ४
माय झिजली, झिजली, हाडाची काडं केली,
भरून पाखरांची चोच, सदा उपाशी निजली ५
गेल्या उडून चिमण्या, राघू गेले दूरदेशी,
ख्याली, खुशाली मागते हात जोडे देवापाशी ६

**- सौ. मनोरमा बोराडे**
छत्रपती संभाजीनगर

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559